४०७

महागाई भत्ता वाढ देण्याबाबत

CR1980041501

## महाराष्ट्र शासन

### वित्त विभाग

शासन निर्णय क्र. सीपीए. ११८०/सीआर-१८३/एसईआर-७

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ एप्रिल १९८०

**पहा**—(१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सीपीए. ११७८/सीआर-७८१/एसईआर-७, दिनांक १७-८-७८.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सीपीए. ११७९/सीआर-२६२/एसईआर-७, दिनांक ४-७-७९.

(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सीपीए. ११७९/सीआर-६७८/एसईआर-७, दिनांक २६-१०-७९.

**शासन निर्णय**.—शासन असा आदेश देत आहे की, ज्या पूर्णकालिक शासकीय कर्मचाऱ्यांना संबंधित विद्यमान आदेशानुसार महागाई भत्ता अनुज्ञेय आहे, अशा कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोव्हेंबर १९७९ पासून खाली दर्शविल्या-प्रमाणे महागाई भत्यामध्ये वाढ देण्यात येत आहे. ही वाढ प्रस्तावनेत नमूद केलेल्या आदेशान्वये दिनांक १ नोव्हेंबर १९७९ रोजी जारी असलेल्या दराहून अधिक राहील :—

| I. वेतन (सुधारित) | दिनांक १ नोव्हेंबर १९७९ पासून दरमहा महागाई भत्ता वाढीचा दर |
|---|---|
| रुपये ४०० पर्यंत .. | .. ४ टक्के. |
| रुपये ४०० हून अधिक आणि रुपये १,६०० पर्यंत. | ३ टक्के परंतु कमीत कमी रुपये १६ आणि जास्तीत जास्त रुपये ३०. |
| रुपये १,६०१—१,६६० | .. रुपये ९० या रकमेमधून शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. सीपीए.११७९/सीआर-६७८/एसईआर-७, दिनांक २६-१०-१९७९ अन्वये मंजूर केलेली वाढ वजा करून येणारी रक्कम. |
| रुपये १,६६१—२२९० .. | .. रुपये ९०. |
| रुपये २,२९१—२,३०० .. | .. वेतन रुपये २,३८० एवढी रक्कम होण्यास कमी पडत असेल ती रक्कम. |
| रुपये २,३०१—२,३८० .. | .. रुपये ८०. |
| रुपये २,३८१—२,३९९ .. | .. रुपये ८१ ते रुपये ९९ अशी वेतनाप्रमाणे बदलत जाणारी रक्कम उदा. रुपये ८१—रुपये २,३८१ या वेतनाकरिता रुपये ८२—रुपये २,३८२ या वेतनाकरिता आणि पुढे वरीलप्रमाणे. |

ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन रु. २००/– पेक्षा कमी असेल आणि त्यांच्या बाबतीत जर असे आढळून आले की आतापर्यंत निर्गमित केलेल्या आदेशान्वये त्यांना पूर्वी मिळणारी महागाई भत्याची रक्कम जर या आदेशान्वये दिनांक १ मार्च १९८० पासून देय असलेल्या महागाई भत्यापेक्षा जास्त किंवा समान होत असेल तर अशा कर्मचाऱ्यांना वरील वाढ अनुज्ञेय असणार नाही.

II. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. सीपीए. ११७९/सीआर-२६२/एसईआर-७, दिनांक ४ जुलै १९७९ अन्वये रु. २,४०० आणि त्याहून अधिक वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोव्हेंबर १९७९ पासून देय असलेल्या महागाई भत्याच्या दरामध्ये फेरबदल करण्यात येत असून अशा कर्मचाऱ्यांना दिनाक १ नोव्हेंबर १९७९ पासून एकूण महागाई भत्याची रक्कम खालीलप्रमाणे देय राहील :—

| वेतन (सुधारित) | दि. १ नोव्हेंबर १९७९ पासून देय असलेल्या एकूण महागाई भत्त्याची रक्कम |
|---|---|
| रुपये २,४००—२,६०० .. | .. रुपये ४५० परंतु वेतन अधिक महागाई भत्ता मिळून होणारी रक्कम रुपये २,९५० पेक्षा अधिक होता कामा नये. |
| रुपये २,६०१—२,६५० .. | .. रुपये ३५०. |
| रुपये २,६५१ आणि त्याहून अधिक | .. रुपये ३००. |

III. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सीपीए. ११७९/सीआर-६७८/एसईआर-७, दिनांक २६ ऑक्टोबर १९७९ अन्वये दिनांक १ मार्च १९८० पासून देय असलेल्या महागाई भत्त्याच्या दरामध्ये फेरबदल करण्यात येत असून, दिनांक १ मार्च १९८० पासून खाली दर्शविलेल्या सुधारित दराप्रमाणे महागाई भत्ता देय असेल. जरी कांही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दिनांक १ मार्च १९८० पूर्वी एकूण मिळणारी महागाई भत्त्याची रक्कम जास्त अनुज्ञेय ठरली असेल तरी दिनांक १ मार्च १९८० पासून आदा करण्यात येणारी महागाई भत्त्याची रक्कम खाली दर्शविल्याप्रमाणे देय असलेल्या महागाई भत्त्याच्या रकमेशी काटेकोरपणे निर्बंधित करावी :—

| वेतन (सुधारित) | दिनांक १ मार्च १९८० पासूनचा दरमहा महागाई भत्त्याचा दर |
|---|---|
| रुपये ३०० पर्यंत .. | .. (अ) ३६ टक्के अधिक<br>(ब) वेतनाच्या ३३.५ टक्के, परंतु कमीत कमी रुपये ३५ अधिक वेतनाच्या १६ टक्के आणि जास्तीत जास्त रुपये ९८. |
| रुपये ३०० हून अधिक आणि रुपये ४०० पर्यंत. | .. (अ) २७ टक्के परंतु कमीत कमी रुपये १०८ अधिक<br>(ब) रुपये ६२ अधिक वेतनाच्या १२ टक्के. |
| रुपये ४०० हून अधिक आणि रुपये ८०० पर्यंत. | .. (अ) २७ टक्के अधिक<br>(ब) वेतनाच्या २४.५ टक्के, परंतु कमीत कमी वेतनाच्या १५.५ टक्के अधिक रुपये ४८. |
| रुपये ८०० हून अधिक आणि रुपये ९०० पर्यंत. | .. (अ) २७ टक्के अधिक<br>(ब) रुपये १०० अधिक वेतनाच्या १२ टक्के. |
| रुपये ९०० हून अधिक अणि रुपये १,००० पर्यंत. | .. (अ) रुपये २४३ अधिक<br>(ब) रु. १२७ अधिक वेतनाच्या ९ टक्के परंतु जास्तीत जास्त रुपये २१७. |
| रुपये १,००० हून अधिक आणि रुपये २,२९० पर्यंत. | .. रुपये ४६०. |
| रुपये २,२९१—२,३०० .. | .. वेतन रु. २,७५० एवढी रक्कम होण्यास कमी पडत असेल ती रक्कम. |
| रुपये २३०१—२६०० | रुपये ४५० परंतु वेतन अधिक महागाई भत्ता मिळून होणारी रक्कम रुपये २,९५० पेक्षा अधिक होता कामा नये. |
| रुपये २,६०१—२,६५० | रुपये ३५० |
| रुपये २,६५१ आणि त्याहून अधिक | रुपये ३०० |

**टीप.**—(१) या आदेशांकरिता "सुधारित वेतन" म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९७८ अन्वये विहीत केलेल्या सुधारित वेतनश्रेणीमध्ये देय असलेले वेतन. जे शासकीय कर्मचारी अद्याप असुधारित वेतनश्रेणी स्वीकारल्या कारणाने अथवा सुधारित वेतनश्रेणीत वेतन निश्चिती होण्यास वेळ लागत असल्यामुळे दिनांक १ एप्रिल १९७६ पूर्वी अस्तित्वात असलेल्या वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत, अशांना ते सुधारित वेतनश्रेणीत वेतन घेण्यास सुरुवात करीपर्यंत वरील आदेशानुसार विहीत केलेल्या वाढीव दराने महागाई भत्ता मिळण्यास पात्र समजण्यात यावे. तथापि, त्यांच्या बाबतीत, वाढीव महागाई भत्त्याची रक्कम, १९७६ पूर्वीच्या वेतनश्रेणीतील त्यांचे वेतन अधिक दिनांक १ जानेवारी १९७३ रोजी अंमलात असलेल्या दराच्या प्रमाणात महागाई भत्ता मिळून होणाऱ्या एकूण रकमेच्या आधारावर काढण्यात यावी.

(२) वरील आदेशान्वये मिळणारा महागाई भत्ता सर्वांत जवळच्या १० पैशांशी पूर्णांकित करण्यात यावा.

(३) सुधारित म्हणजेच १९७६ च्या नंतरच्या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना १ जानेवारी १९७३ च्या दराने मिळणारा महागाई भत्ता मिळणार नाही.

२. सदरहू आदेश शासनाच्या विविध विभागांतील कार्यव्ययी आस्थापनांवर काम करणाऱ्या कर्मचारी-वर्गालाही खालील शर्तींवर लागू होतील :—

(१) कार्यव्ययी आस्थापनांवर काम करणाऱ्या व्यक्तींना मिळणारे वेतन, नियमित आस्थापनेवरील तत्सम काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांइतकेच असले पाहिजे, आणि

(२) शासनाच्या सर्वसाधारण आदेशानुसार त्यांना महागाई भत्ता अनुज्ञेय असला पाहिजे.

३. वरील आदेश अंशकालिक शासकीय कर्मचारी व नैमित्तिक कामगार यांना लागू नाहीत.

२०३

४. संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीचा खर्च ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्या लेखा शीर्षाखाली हा खर्च घालण्यात यावा व त्या लेखा शीर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागवावा.

५. वरील आदेश फक्त शासकीय कर्मचाऱ्यांना लागू आहेत. जिल्हा परिषद कर्मचारी, अशासकीय अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्थांतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, नगर परिषद कर्मचारी यांच्या बाबतीत समान आदेश संबंधित मंत्रालयीन विभागातर्फे काढण्यात यावेत.

६. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वृ. प्रभाकर,**
शासनाचे विशेष सचिव,
वित्त विभाग.

प्रत रवाना—

महालेखापाल, महाराष्ट्र–१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र–२, नागपूर.
लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
राज्यपालांचे सचिव.
राज्यपालांचे सल्लागार.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
*प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
शिक्षण, रोजगार व युवक सेवा विभाग.
ग्रामविकास विभाग.
नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग.
सिनीअर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
मंत्रालयातील सर्व विभाग.
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड फाईल, वित्त विभाग, एसईआर.-७.

*पत्राद्वारे

K.W.P.C

१९८० चा क्रमांक [illegible] / सआिद् . १९८४ / आ-३
प्रतिलिपी – सर्व उपप्र. [illegible]
माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.

पुणे - ३०-६-८०

2136

[signature]
[stamp] ... आणि संचालक,
... (म. रा.), पुणे
यांचे करिता

प्रत – कार्यालय अधीक्षक – ई-१